**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये 'एक विषय, एक वृक्षारोपण संवर्धन आणि संगोपन' संकल्पना राबविण्याबाबत महाविद्यालयांना सूचना

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी 'एक विषय, एक वृक्षारोपण संवर्धन आणि संगोपन' ही संकल्पना राबवावयाची आहे. तसेच महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र २०२२-२०२३ पासून प्रथम वर्षात प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसर, आपले घर, गावातील भूभाग आणि सामाजिक वनीकरणाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेच्या ठिकाणी 'एक विषय, एक वृक्षारोपण करुन त्याचे संवर्धन आणि संगोपन' करावयाचे आहे. सदर संकल्पनेचा संक्षिप्त अहवाल व छायाचित्रे संलग्नित महाविद्यालयांनी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाकडे सादर करावयाची आहेत.

याबाबत विद्यार्थी विकास विभागाने विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांना नुकतेच पत्र पाठवून कळविले आहे. तरी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून 'एक विषय, एक वृक्षारोपण संवर्धन आणि संगोपन' ही संकल्पना राबवावी, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थी विकास मंडळाचे प्रभारी संचालक डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी त्यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनीवरुन संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २१/०२/२०२२.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी